**बातमी क्र.०१**

जळगाव दि.10 ( ) ग्रामीण भागातील विकासात राष्ट्रीय सेवायोजनेचे योगदान खूप मोलाचे असून या योजनेतून माणूस आणि माणूसकी कळते असे प्रतिपादन प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे बुधवारी विद्यार्थी विकास व रासेयो कार्यक्रम अधिकारी,समन्वयक यांची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना प्रा.माहुलीकर बोलत होते. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य दीपक पाटील आणि विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे उपस्थित होते.

प्रा.माहुलीकर म्हणाले की, रासेयोमधून विद्यार्थी विकासाची कामे मोठया उत्साहाने करतात. हेच विद्यार्थी पुढे समाज घडविण्याचे काम करीत असतात. देशाच्या प्रगतीत विशेषतः ग्रामीण भागाच्या प्रगतीत रासेयोचे योगदान मोठे आहे. प्रारंभी प्रा.एस.टी.इंगळे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमात शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील विद्यापीठस्तरीय रासेयो उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. जळगाव जिल्हयातून चोपडा येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला तर नंदुरबार जिल्हयातून सार्वजनिक कला व वाणिज्य महाविद्यालय, विसरवाडी यांना हे पुरस्कार देण्यात आले. जळगाव जिल्हयातून डॉ.रमाकांत बागुल (महात्मा गांधी महाविद्यालय, चोपडा), नंदुरबार जिल्हयातून डॉ.विशाल करपे (विसरवाडी) यांना पुरस्कार देण्यात आले. विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार कुणाल मानकर (धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर), कल्पेश बोरसे (विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे) आणि वैशाली पाटील (ट्रायबल एज्युकेशन सोसायटीचे कला,वाणिज्य व विज्ञान महा.नंदुरबार) यांना देण्यात आले. औरंगाबाद येथे झालेल्या राज्यस्तरीय आव्हान आपत्ती प्रशिक्षण शिबिरात प्रा.हेमंत जोशी आणि डॉ.पंचशिला वाघमारे यांना राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट पुरुष व महिला पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला. पुरकार्थीनी यावेळी मनोगत व्यक्त केले. डॉ.सुनील कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. प्रा. दीपक सोनवणे यांनी विद्यापीठ रासेयो गीत सादर केले तर एन.जी.पाटील यांनी आभार मानले.

दुपारच्या सत्रात ` बालशिक्षण हक्क ` या विषयी तपस्या प्रतिष्ठानचे तपस सुत्रधार यांनी माहिती दिली. त्यानंतर जिल्हा माहिती अधिकार विलास बोडखे यांनी युवा माहिती दूत या विषयावर सादरीकरण केले. या कार्यक्रमात महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाबाबत माहिती देण्यात आली.

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१० ( ) : राज्य शासनाच्या महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीच्या वतीने महाराष्ट्रातील नवउद्योजक, विद्यार्थी आणि स्टार्टअप यांना कल्पना मांडण्यासाठी काढण्यात आलेल्या महाराष्ट्र स्टार्टअप अंतर्गत शनिवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दिवसभराची कार्यशाळा (बूटकॅम्प) आयोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील तरुणांच्या नवउद्योजकीय संकल्पनाद्वारे नवीन उद्योग सुरु व्हावेत व हे तरुण आत्मनिर्भर व्हावेत यासाठी महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा काढण्यात आली आहे. ४ ऑक्टोबर पासून यात्रेला प्रारंभ झाला असून ३ नोव्हेंबरला नागपूर येथे या यात्रेची सांगता होणार आहे. जळगाव येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात या यात्रेचा बूटकॅम्प होणार आहे. १३ ऑक्टोबर रोजी सिनेट सभागृहात सकाळी १० वाजता होणाऱ्या या कार्यशाळेत विद्यापीठाशी संलग्न आजी-माजी विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. नवीन उद्योग उभारणीच्या त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना या कार्यशाळेत त्यांना मांडता येणार आहेत. ज्या कल्पना अत्यंत नाविन्यपूर्ण असतील त्यासाठी स्वतंत्र चर्चा देखील केली जाणार आहे. उद्योग उभारणीची सविस्तर माहिती, कर्ज याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना उद्योगाबाबत नाविन्यपूर्ण कल्पना मांडायच्या आहेत त्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी अथवा प्रा.भूषण चौधरी (मो.नं.९८२३४ ५२५३९), प्रा.विकास गीते (मो.नं.९४२०० ६७३२१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

**बातमी क्र.०३**

जळगाव दि. 10 (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संलग्नता विभागाच्या वतीने दि.9 ऑक्टोबर रोजी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबद्दल माहिती व्हावी यासंदर्भात विद्यापीठात कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी उच्च शिक्षण, सहसंचालक कार्यालयाचे सहायक प्रशासकीय अधिकारी राम राठोड, उपवित्त अधिकारी सोमनाथ गोहिल, सहायक कुलसचिव जी.एन.पवार, सहायक पूर्वलेखक जे.पी.शिरसाठ उपस्थित होते. राम राठोड यांनी राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना तसेच इतर विविध शासकीय शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन महाडीबीटीमहाआयटी पोर्टलवर शिष्यवृती अर्ज नोंदणीबाबतची सविस्तर माहिती दिली. विलास बाविस्कर यांनी सुत्रसंचलन केले. यावेळी प्रशाळांमधील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

---

जा.क्र. : कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : १० ऑक्टोबर, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी